# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांकः17.06.2026 वारःबुधवार

---

1. फ्रांसमध्ये सुरू असलेल्या जी-7 शिखर परिषदेत आंतरराष्ट्रीय भागीदारी निर्माण करण्यासाठी परस्पर विश्वास महत्वाचा असल्याच्या मुद्द्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा भर, विविध देशांच्या राष्ट्रप्रमुखांशी चर्चा
2. यमुना नदीच्या जिर्णोद्धारासाठी तयार करण्यात आलेल्या किशाऊ बांध योजनेला सहा राज्यांची मंजुरी
3. येत्या 21 जून रोजी होणाऱ्या नीट पुर्नपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी आणि पालकांना कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचराष्ट्रीय परीक्षा मंडळाच आवाहन
4. केंद्रीय माहिती आणि प्रसारण आणि रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आज एक दिवसाच्या पुणे दौऱ्यावर आणि
5. 20 षटकांच्या महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारतीय महिला संघाचा सामना नेदरलँड संघाशी होणार

**<u>मोदी-G7</u>**

फ्रान्समधील एवीयन शहरात सुरू असलेल्या, 52व्या जी-सात शिखर परिषदेत जगभरातील प्रमुख देशांचे नेते, महत्वाच्या आंतरराष्ट्रीय आव्हानांवर चर्चा करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी G7 शिखर परिषदेत 'नवीन भागेदारी आणि आंतरराष्ट्रीय एकजुटीच्या पुनरस्थापना' या विषयावरील सत्राला संबोधित केलं. या सत्रादरम्यान पंतप्रधानांनी, आंतरराष्ट्रीय भागीदारी निर्माण करण्यासाठी परस्पर विश्वास महत्वाचा असल्याच्या मुद्द्यावर जोर दिला. भारतानं नेहमीच मानवतेला प्रथम प्राधान्य देण्याचा दृष्टिकोन स्वीकारला असून, आंतरराष्ट्रीय सौर आघाडी,आपत्ती-प्रतिरोधक पायाभूत सुविधांसाठी आघाडी, जागतिक जैवइंधन आघाडी, मिशन लाइफ आणि एक पेड माँ के नाम मोहीम यांसारख्या भारताच्या नेतृत्वाखालील उपक्रमांमध्ये हे दिसून येतं अशी माहिती मोदी यांनी दिली.

भारताची आंतरराष्ट्रीय भागीदारीची दृष्टी 'वसुधैव कुटुंबकम' या कालातीत सूत्रावर आधारित आहे, या सर्वसमावेशक दृष्टिकोनामुळेच जगाच्या विविध भागांत नैसर्गिक आपत्ती कोसळल्या तेव्हा भारतानं सर्वप्रथम प्रतिसाद दिला आहे असंही पंतप्रधान म्हणाले.आंतरराष्ट्रीय कायद्याचा अनादर हा आंतरराष्ट्रीय एकता निर्माण करण्यातील सर्वात मोठा अडथळा असून, त्यावर प्राधान्यानं लक्ष देणं आवश्यक आहे यावर मोदी यांनी यावेळी जोर दिला.

या दौऱ्यात पंतप्रधान मोदी यांनी कॅनडा आणि ब्रिटनच्या पंतप्रधानांशी तसंच संयुक्त अरब अमिरातीच्या अध्यक्षांशी द्विपक्षीय चर्चा केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याबरोबरही त्यांची बैठक झाली.

जी सात देशांनी, भारतासह अनेक भागीदार देशांच्या सहकार्यानं जागतिक आरोग्य आणि विकास सहकार्य मजबूत करण्यासाठी अनेक उपक्रमांची घोषणा केली. काँगो आणि युगांडामध्ये पुन्हा उदभवणाऱ्या इबोलाच्या उद्रेकाला समन्वित आंतरराष्ट्रीय प्रतिसाद देण्याचं आवाहन केलं. भारत, इजिप्त, केनिया आणि दक्षिण कोरिया यांनी संपर्क शोध, सीमेवरील टेहळणी आणि सामुदायिक सहभाग यांसारख्या विषयांवरील उपाययोजनांच्या आवाहनात सहभाग घेतला.

यावेळी जी सात देशांच्या नेत्यांनी इबोलाच्या दुर्मिळ प्रकारावरील लस, निदान आणि उपचारांच्या विकासासाठी पाठिंबा आणि कर्करोगाविरुद्धच्या जागतिक लढ्याला गती देण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

**<u>गोयल</u>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी काल, फ्रान्समधील उद्योगपती, मुख्य कार्यकारी अधिकारी, गुंतवणूकदार आणि नवोन्मेषकांना, मोठ्या प्रमाणात नवोन्मेष करून एक उज्ज्वल आणि शाश्वत भविष्य घडवण्यासाठी भारतासोबत भागीदारी करण्याचं आवाहन केलं. फ्रान्समधील नीस इथं 'भारत इनोव्हेट्स 2026' परिषदेच्या समारोप समारंभात गोयल बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांचं प्रेरणादायी नेतृत्व आणि त्यांची दूरदृष्टी तसंच 'भारत-फ्रान्स नवोन्मेष वर्ष 2026' मुळे खऱ्या अर्थाने परिवर्तनकारी मंचांची सुरुवात झाली आहे असंही गोयल यांनी अधोरेखित केलं.

**<u>किशाऊ योजना</u>**

उत्तर भारतातील महत्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या यमुना नदीच्या जिर्णोद्धारासाठी तयार करण्यात आलेल्या किशाऊ बांध योजनेला सहा राज्यांनी सहमती दर्शवली आहे. यामध्ये हिमाचल प्रदेश, दिल्ली, उत्तरप्रदेश, उत्तराखंड, हरियाना आणि राजस्थान या राज्यांचा समावेश आहे. काल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली नवीदिल्लीत झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. यामुळे यमुना नदीच्या शुद्धीकरण कार्यक्रमाला चालना मिळणार आहे. या सहा राज्यांमध्ये या किशाऊ योजनेच्या करारावर हस्ताक्षर झाल्यानंतर त्याला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजूरी घेण्यात येईल अस गृहमंत्रालयाने याबाबत जारी केलेल्या प्रसिद्धी निवेदनात म्हंटल आहे. या योजनेसाठीचा 90 टक्के खर्च केंद्रसरकार आणि 10 टक्के खर्च 6 राज्य मिळून करणार आहेत. या किशाऊ बांध योजनेद्वारे हिमाचल प्रदेशला मिळणार यमुनेच पाणी, दिल्ली आणि राजस्थानलाही देण्यात येणार आहे .

**<u>नीट</u>**

येत्या 21 जून रोजी होणाऱ्या नीट पुर्नपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर, राष्ट्रीय परीक्षा मंडळाने या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थी आणि पालकांना सतर्कता बाळगण्याच आणि कोणत्याही अफवांवर विश्वास न  ठेवण्याचं आवाहन केल आहे. याबाबत एन टी एच्या वतीने समाजमाध्यमावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या संदेशात म्हंटल आहे की, सध्या टेलिग्रामवरविविध चॅनल्सच्या माध्यमातून आगामी नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका उपलब्ध करू देण्यासाठी 14 ते 25 हजार रुपयांची मागणी केली जात आहे. त्याला विद्यार्थी आणि पालक बळी पडण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे नीट पुनरपरीक्षेची कोणतीही प्रश्नपत्रिका अजिबात फुटली नसल्याच राष्ट्रीय परीक्षा मंडळाने स्पष्ट केल आहे .
दरम्यान, केंद्र सरकारनं 22 तारखेपर्यंत देशात टेलिग्राम या सोशल मीडिया वेबसाइटच्या वापरावर निर्बंध लादले आहेत.

**<u>पुणे-शिर्डी रेल्वे</u>**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण तसंच रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आज एक दिवसाच्या पुणे दौऱ्यावर आहेत. पुणे आणि साईनगर शिर्डी दरम्यानची  पहिली थेट दैनंदिन रेल्वे सेवा आजपासून सुरू होत आहे. वैष्णव, पुणे रेल्वे स्थानकावरून या रेल्वेगाडीला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. पुणे, अहिल्यानगर आणि साईनगर शिर्डी परिसरातील प्रवासी, विद्यार्थी, व्यावसायिक तसंच साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी ही रेल्वेसेवा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आजच्या पुणे दौऱ्यात अश्विनी वैष्णव हडपसर रेल्वे स्थानकालाही भेट देणार आहेत. तत्पूर्वी ते, रांजणगाव इथं जबील कंपनी, इको बॉक्स इंडस्ट्रियल पार्क आणि रांजणगाव गणपती एम.आय. डी. सी. ला भेट देणार आहेत. जबीलकंपनीत सुरू होणाऱ्या अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक उत्पादन केंद्राचं उद्घाटन होणार त्यांच्या हस्ते होणार असून यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत.

**<u>पोलिस दल</u>**

महाराष्ट्र पोलिस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र सरकारने 733 कोटी 28 लाख रुपये खर्चाच्या योजनेला मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल समाज माध्यमावरून ही माहिती दिली. या योजनेअंतर्गत 60 टक्के निधी केंद्र सरकार आणि 40 टक्के निधी राज्य सरकार उपलब्ध करून देणार आहे. महाराष्ट्र पोलिस दल अधिक आधुनिक, सक्षम आणि तंत्रज्ञानसज्ज होण्यास या निधीमुळे मदत होणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानले.

**<u>क्रिकेट</u>**

पुरुषांच्या क्रिकेट मध्ये भारत आणि अफगाणिस्तान दरम्यान 3 एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला दूसरा सामना आज लखनौ इथ खेळला जाणार आहे. दुपारी दीड वाजता हा सामना सुरू होईल.

**<u>फीपा</u>**

फीपा विश्वकप फुटबॉल स्पर्धेत न्यू जर्सी इथ काल अ  गटात  फ्रांस संघाने सेनेगल संघाचा 3-1 ने पराभव केला.

**<u>क्रिकेट</u>**

20 षटकांच्या महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारतीय महिला संघाचा सामना नेदरलँड संघाशी होणार आहे. ब्रिटनमधील लिडस् मैदानावर भारतीय प्रमाण वेळेनुसार आज संध्याकाळी 7 वाजता हा सामना होईल. यापूर्वीच्या सामन्यात भारतीय महिला संघाने पाकिस्तान संघाचा 64 धावांनी पराभव केला होता.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं , नमस्कार.